# डॉ. खत्री महाविद्यालयात दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा

**चंद्रपूर :** स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर येथे १७ ते १८ फेब्रुवारी या कालावधीमध्ये विद्यापीठस्तरीय दोन दिवसीय आपत्तीव्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेश सुरबाडे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जी. आर. सपाट, डॉ. व्ही.व्ही.लाडे, कार्यशाळेचे समन्वयक प्रा. दिलीप बावणे, त्याचबरोबर विजय गीनगुले, रामभवर सिंग हाडा, अजय यादव, ताराचंद मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते. या दोन दिवसीय आपत्तीव्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील विद्यार्थी आणि त्यांचे समन्वयक यांचीही उपस्थिती होती. विद्यार्थिसंख्या भरपूर असल्यामुळे मार्गदर्शकांनी आपल्या तांत्रिक सत्रात या कार्यशाळेच्या अनुषंगाने प्रात्याक्षिक करून दाखविले. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील विजय गीनगुले, रामभवरसिंग हाडा, अजय यादव, ताराचंद मेश्राम यांनी विविध आपत्ती बचाव कसे करायचे याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. ही कार्यशाळा विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक प्रा. दिलीप बावणे यांनी आयोजित केली. याकरिता समन्वय समितीचे डॉ. आर. यु. मुरमाडे, प्रा. संतोष कावरे, डॉ. रवी वाळके, डॉ. डी. एन. वराडे तसेच महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.